**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२७१८/२०२४**

**निशाणी क्र.३०**

**अ.सा.क्र.४**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४**

**नाव – निता आनंद बिडलान**

**वय– ४७ वर्ष व्यवसाय– गृहिणी**

**पत्ता – बी–५, २११ ग्रीन हाईव्ह सोसायटी, पुणे.**

**सरतपास शपथेवर सुरु**

**अभियोगपक्षातर्फे सुविदय सरकारी अभियोक्ता श्री. जी. बी. सरवदे यांच्यामार्फत**

आरोपींना ओळखते. एक महिला सोडून इतर आरोपीं न्यायदान कक्षात हजर आहेत. (आरोपी प्रणिता यांच्या तर्फे गैरहजेरीमाफीचा अर्ज देणार असल्याचे त्यांचे सुविद्य विधीज्ञ सांगितले. इतर आरोपींना साक्षीदाराने पाहून ओळखले.) मी पियुष दिवसे यांना ओळखते, या प्रकरणातील इतर साक्षीदारांना ओळखत नाही. सन २०२४ मध्ये मी ग्रीन हाईव्ह सोसायटी, हरपळे वस्ती फुरसुंगी येथे राहत होते.

२. दिनांक १७ फेब्रुवारी, २०२४ रोजी संध्याकाळी ०६.३० ते ०७.३० च्या दरम्यान सोसायटीच्या आतामध्ये गेटजवळ घडली होती. मी माझ्या डॉगला वॉकसाठी घेवून खाली गेले होते. मी सोसायटीच्या बाहेर त्याला घेवून गेले होते. एक बाहेरचा डॉग सोसायटीमध्ये आला होता. त्याने माझ्या डॉगवर हल्ला केला व तो त्याला भुंकत होता. एक छोटा मुलगा खेळत तेथे आला व कदाचित घाबरला होता. परत पळला तर तो पडला होता. तेथे असणा–या एका माणसाने त्याला उचलले होते. मी माझ्या डॉगला घेवून बाहेर गेले होते.

३. थोड्या वेळाने प्रणिता, तिचे आडनांव माहित नाही, ती आज न्यायदान कक्षात हजर नाही. हजर असती तर ओळखले असते. ती जोराने आली आणि माझ्या हाताला ओढून गेटकडे नेले होते. तेथे पूर्वीच गर्दी जमा झालेली होती. प्रणिताच्या पतीने, श्री. मवाणी यांनी जोरजोरात ओरडणे

सुरु केले होते. ते जोराने ओरडत होते की, 'इसको मारो, इसकी वजहसे हमलोग बहोत परेशान हैं'. मी डॉगजना दरारोज खाऊ घालते त्यामुळे ते तसे म्हणत होते. मी पोलीसांना फोन करत होते. मला त्यावेळी प्रणिताने मारायला सुरु केले होते. तिच्या मागे चेतना मवाणी, अश्वीनी हे होते. चेतना मवाणीचे पती व प्रणिताचे पती सगळ्या महिलांना उकसावत होते. माझे सामान फेकून द्यावे, मला घरी जावू देवू नये असे विजय ठवरे व मवाणी म्हणत होते. मी त्यांना विनंती केली होती की, पोलीस ठाण्यामध्ये जावु यायत, तेथे चर्चा करुया. माझा मुलगा अवनितने ११२ ला कॉल केला होता.

४. ३० ते ३५ मिनिटानंतर पोलीस आले व त्यांनी मला तेथून बाहेर काढले होते. पोलीसांनी त्यांना थोडे काम असल्याचे सांगून माझ्या गाडीने त्यांना पोलीस ठाण्यात जायला सांगितले होते. मला हाताने मारहाण करण्यात आली होती. पोलीस ठाण्यात श्री. जाधव बसलेले होते. मी फिर्याद दिली होती. आता दाखवण्यात आलेली सही माझी असून फिर्यादीतील मजकूर खरा आहे. ( खबरेला **निशाणी क्र.३१** देण्यात येते.) आता दाखवण्यात आलेली सही माझी असून प्रथम खबरी अहवालातील मजकूर खरा आहे. ( प्रथम खबरी अहवालाला **निशाणी क्र.३२** देण्यात येते.)

५. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी माझा जबाब माझे सांगण्याप्रमाणे घेतला होता. पोलीस सोसायटीमध्ये आले होते. त्यांनी चौकशी केली होती. त्यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज घेतले होते. मी त्यावेळी कुठे होते ते त्यांनी मला विचारले होते. त्यांनी पंचनामा केला नव्हता. त्याच्या व्यतिरिक्त पोलीसांनी काहीही केले नव्हते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे सुविदय विधिज्ञ श्री. पी.टी. गटकुळ यांच्यामार्फत**

६. मी ग्रीन हाईव्ह सोसायटीमध्ये सन २०१३ पासून राहते. मी पाळलेले कुत्रे देशी आहे. मी एक कुत्रे घरी ठेवलेले असून एक कम्युनिटी डॉग सोसायटीमध्ये असते. मी पूर्वी ब–याच कुत्र्यांना

सोसायटीमध्ये खाऊ घालत होते. आता स्टेरिलायझेशन करुन करुन चार खाली सोसायटीमध्ये आणि एक माझ्या घरामध्ये असे कुत्रे राहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कधी कधी खाऊ घालतांना शेजारचे कुत्रे सुध्दा येतात. मी ज्यांना खाऊ घालते त्या कुत्र्यांना अँटीरेबीज लसी दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याबाबत पुणे महानगरपालिका, ॲनिमल वेलफेअर बोर्ड किंवा महाराष्ट्र ॲनिमल वेलफेअर बोर्ड यांना कळवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुणे महानगरपालिका, ॲनिमल वेलफेअर बोर्ड, दुय्यम निबंधक किंवा महाराष्ट्र ॲनिमल वेलफेअर बोर्ड यांनी मला फिडींग पॉईंट नेमून दिलेला नाही.

७. आरोपींचे फ्लॅट नंबर्स, मजले मला माहित नाहीत. आरोपी बी-३ विंगमध्ये राहतात. अश्वीनी कदाचित बी-२ मध्ये राहतात. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७/०२/२०२४ पूर्वी सुध्दा कुत्रे आत येवून गाडीचे कव्हर, सीट फाडणे असे प्रकार घडलेले आहेत. त्या तारखेपूर्वी कुत्रे लहान मुलांच्या मागे पळणे, वृध्दांना चावणे असे प्रकार सोसायटीमध्ये घडले होते किंवा नाही ते माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७/०२/२०२४ रोजी मी बाहेरच्या चार कुत्र्यांना घटना घडण्यापूर्वी खायला घालत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या घरातील कुत्र्याला दिनांक १७/०२/२०२४ रोजी खाली घेवून गेले होते तेव्हा सोसायटीतील चार व बाहेरील एक कुत्रा तेथे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रणिता ठवरे आणि मेमाणे काय घटना घडली ते विचारण्यासाठी आल्या होत्या. त्यादिवशी चेतना मवाणी साडीमध्ये होत्या, प्रणिता व अश्वीनीने सलवार कमीज घातलेल्या होत्या. खूप गर्दी पाहून घाबरुन गेल्यामुळे मला त्यांच्या त्या दिवशीच्या कपड्यांचे रंग सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सोसायटीतील ५० ते ६० लोकं तेथे आलेले होते. आरोपी त्यापूर्वी माझ्या घरी खूप भांडण करायला आले होते, त्यामुळे मी त्यांना ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, ते भांडण कुत्र्यांच्या वादातून झाले होते.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितलेली बाब माझ्या कुत्र्यावर

**निशाणी क्र.३०**

**अ.सा.क्र.४**

बाहेरच्या कुत्र्यांनी हल्ला केला असे प्रथम खबरी अहवाल निशाणी क्र.३२ देतेवेळी सांगितले नव्हते. माझे सामान फेकून द्यावे, मला घरी जावू देवू नये असे विजय ठवरे व मवाणी म्हणत होते, असे प्रथम खबरी अहवाल निशाणी क्र.३२ देतेवेळी सांगितले होते व पोलीसांनी मला ते वाचून दाखवले होते. निशाणी क्र.३२ पाहुन सांगते की, तसे त्यामध्ये नमूद नाही. पोलीस छोटे छोटे बदल करण्यासाठी एफ.आय.आर. घेवून जात असल्यामुळे, मला मराठी येत नसल्यामुळे त्यांनी तसे लिहिल्याचे मला सांगितले होते. माझ्याकडे असणा–या प्रतीमध्ये तसे नमूद आहे, नंतर बदल झाल्यामुळे निशाणी क्र.३२ मध्ये तो मजकुर नाही. ती माझ्याकडे असणारी प्रत मी न्यायालयात दाखल करु शकते.

९. मी प्रयत्न करत होते परंतू माझा फोन ११२ ला लागला नव्हता. दिनांक १७/०२/२०२४ रोजी पोलीस आले होते तेव्हा मी त्यांचा मुलगा पडला, त्यावेळी मी कुत्र्यांना खाऊ घालत असल्यामुळे माझ्याशी भांडण केले होते, असे सांगितले होते. मी पोलीसांना पुर्ण माहिती सांगितली नव्हती. घटनास्थळापासून पोलीस ठाणे २ किलोमीटर अंतरावर आहे. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीस आम्हांला आम्ही एफ.आय.आर. देवू नये असे सगळे चालू असते, असे समजावत होते. त्यामुळे फिर्याद देण्यास उशीर झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७/०२/२०२४ रोजी आरोपी माझ्या विरुध्द तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आले होते. त्याच दिवशी त्यांनी माझ्याविरुध्द पोलीस ठाण्यात एन.सी. दिली असेल. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मारहाणीची घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७/०२/२०२४ रोजी माझ्या विरुध्द आरोपींनी एन.सी. दाखल केल्यामुळे मी त्यांच्या विरुध्द दुस–या दिवशी खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**(साक्षीदार यांना मराठी खुप चांगले येत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.डी. गदादे यांच्या समक्ष पुरावा नोंदविण्यात आलेला असून त्यावेळी साक्षीदार यांना मराठी व हिंदीमधून प्रश्न समजल्याचे दिसून येते. न्यायालयीन कामकाजाची भाषा मराठी असल्याने पुरावा**

**मराठीतून नोंदविण्यात आलेला आहे.)**

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

15/6/26

**(योगेंद्र सुरेंद्र कवडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : १५ /०६ /२०२६.